CNRNO.MHLA15000144-2018

# नि.दरखास्त क्र. ०२/२०१८ मधील नि.क्र.२९ खालील आदेश

(विलासराव वि.... बापूराव व इतर)

1. प्रकरणातील धनकोने सदरचा अर्ज ऋणको क्र. १ चे कायदेशिर वारसदार दाखल करण्यास झालेला विलंब ९ महिने १२ दिवस माफ करण्याबाबत दाखल केलेला आहे. त्यांचे थोडक्यात कथन असे की, ऋणको क्र. १ बाबुराव नागोराव शिंदे हे दि. १६.०४.२०१९ रोजी चापोली येथे वृध्दापकाळाने मयत झाले. त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र दि. ०७.०८.२०१९ रोजी प्राप्त झाले. त्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर आणण्यारकीता ९ महिने १२ दिवसांचा विलंब झाला आहे. सदरचा विलंब हा जाणीपुर्वक झालेला नाही. दरखास्त ही जंगम मालमत्तेबाबतची आहे. तरी झालेला ९ महिने १२ दिवसांचा विलंब माफ करण्याची त्यांनी विनंती केली.

2. याउलट, अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ऋणको क्र. १, ३ ते ५ आणि १० ते १२ हे दि.०६.०९.२०१८ रोजी वकीलामार्फत हजर होऊनही म्हणणे दाखल न केल्याने दि. ११.०७.२०१९ पासून प्रकरण त्यांच्या विरुध्द विना म्हणणे चालविण्यात आले. याउलट, ऋणको क्र.१४ आणि १६ तसेच १९ याना सुध्दा तामीली होऊन ते हजर न झाल्याने त्यांच्या विरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्यात आले. इतर ऋणकोंना अद्यापपावेतो तामीली होणे बाकी आहे. त्यामुळे ऋणको क्र. १ चे वकील गैरहजर असल्याने त्यांनी कोणतेही म्हणणे सदर अर्जावर दाखल केलेले नाही.

3. याउलट, धनकोच्या वकीलांनी ऋणको क्र. १ ची मृत्यूच्या प्रमाणपत्राची प्रत नि.क्र. २६ वर दाखल केले आहे, त्यावरुन ऋणको क्र. १ चा मृत्यू दि. १६.०४.२०१९ रोजी झालेला दिसून येतो. त्यामुळे इतर ऋणको व त्याचे वकील गैरहजर असल्याने धनकोला त्याच्या ऋणको क्र. १ च्या मृत्यूची बाब उशिरा कळणे तसेच मृत्यू प्रमाणपत्र काढण्यास आणि सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब समर्पक वाटतो. त्यामुळे वाद विषयाचे गुणदोषावर अंतिम निराकरण करण्याकरिता धनकोला शेवटची संधी अटी व शर्तीवर मंजूर करणे नैसर्गीक न्यायाच्या उद्देशाने समर्पक असल्याने वाद विषयांची अनेकता व गुंतागुंत टाळण्यासाठी, सदर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ प्रस्तुतचा अर्ज रु.१००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. धनको यांना सदरचा अर्ज दाखल करण्यास झालेला ९ महिने १२ दिवसांचा विलंब खर्च दिल्यानंतर माफ करण्यात येतो.

३. सदर रक्कम त्यांनी न्यायालयात दाखल करावी.

स्थळ– चाकूर
दिनांक– १६/०३/२०२०

**(योगेश डी. कोईनकर)**
सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, चाकूर